


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955

बीड - महाराष्ट्र | बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३४ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रुपये

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com










# सुनेत्रावहिनींच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**बारामती । प्रतिनिधी**

अजितदादा पवार ज्या तडफेने काम करत होते त्याच तडफेने सुनेत्रा वहिनी देखील काम करीत आहेत, हे मी गेल्या दोन महिन्यात अनुभवले आहे. बारामतीच्या सर्वांगिण विकासाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वजण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू अशी ग्वाही देत सुनेत्रा पवार यांना देशात विक्रमी मताधिक्याने विजयी करा,असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची सांगता मंगळवारी (ता. २१) बारामतीत झाली. या प्रसंगी आयोजित सांगता सभेत मुख्यमंत्री बोलत होते. दादांच्या पश्चात वहिनींनी आपले दुःख बाजूला ठेवून पक्ष आणि प्रशासनाची धुरा सांभाळली याचे कौतुक करत जनतेचा विश्वास हा महत्त्वाचा मानून त्या कार्यरत असल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले, सुनेत्रा वहिनींच्या माध्यमातून केवळ एक महिला उपमुख्यमंत्रीच नाही तर महाराष्ट्राला एक सक्षम महिला नेतृत्व मिळाले आहे अजित दादांच्या जाण्याने केवळ पवार कुटुंबाचेच नाही तर राज्याचे नुकसान झाले आहे. बारामतीच्या सर्वांगिण विकासाचे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आम्ही वहिनींसोबत कायम असू. ▶▶ उर्वरित पान २ वर

**● दादांचे जिवलग मित्र देवेंद्र....**

देवेंद्र फडणवीस हे केवळ राज्याचे प्रमुखच नाही तर दादांचे जिवलग मित्र होते, त्यामुळे बारामतीच्या विकास कामांना निधीची कोणतीही कमतरता ते भासू देणार नाही, अशी अपेक्षा सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली.

**●....तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही**

अजितदादांच्या अपघाता मागे जे सत्य आहे ते जोपर्यंत बाहेर येत नाही तोपर्यंत आमच्यातील कोणीही स्वस्थ बसणार नाही, यामागील सत्य बाहेर यायलाच हवे अशी सर्वांचीच इच्छा आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**● शरद पवारांचा फोन..**

बारामती विधानसभा निवडणुकीत आम्ही सुनेत्रा पवार यांच्या सोबतच आहोत असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी फोन करून आपल्याला सांगितल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी भाषणात नमूद केले.



बीड : सौंदाणा फाट्याजवळ इलेक्ट्रीक बाईक रस्त्यावरुन चालत असतांना अचानक गाडीने पेट घेतला व जळून खाक झाली, यामध्ये कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

# रशियाच्या युद्धनौका भारताच्या संरक्षणासाठी समुद्रात, शेजारी देशांची उडाली झोप, थेट..

**वृत्तसंस्था**

भारत आणि रशियात संरक्षण संदर्भात एक ऐतिहासिक करार झाला. या करारानंतर पाकिस्तानची झोप उडाली. हेच नाही तर त्यांनी थेट रशियाबद्दल मोठे विधान केले. भारत आणि रशियाने या कराराची अंलबजावणीही सुरू होती. हा करार चीनसाठीही मोठा धक्का मानला जात आहे. भारत आणि रशियातील करारात दोन्ही एकमेकांची जमीन वापरू शकतात. युद्धनौका आणि विमाने तैनात करण्याची परवानगी मिळते. रशियाच्या युद्धनौका भारताचे संरक्षण करणार आहेत. यासोबतच ३००० हून अधिक सैनिक एकमेकांचे संरक्षण करू शकतात. हा 'रेसिप्रोकल एक्सचेंज ऑफ लॉजिस्टिक्स सपोर्ट' (ठएङजड) करार अशा वेळी झाला आहे, जेव्हा



भारत रशियासोबतचे आपले संबंध अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करत आहे. या करारामुळे भारत आणि रशियाचे संबंध अधिक चांगले झाले. भारत रशियातील सैन्यतळांचा वापर करू शकतो, रशिया देखील भारतीय सैन्य तळांचा वापर करू शकतो. थेट रशिया आणि भारत एकमेकांचे संरक्षण करणार असल्याचे कळाल्यापासून पाकिस्तानची झोप उडाली आहे. पाकिस्तानी तज्ज्ञांनी या कराराबद्दल चिंता व्यक्त केली आहे. पाकिस्तानी तज्ज्ञ डॉ. अतिया अली काझमी यांनी रशिया-भारत करारावर नाराजी व्यक्त केली. हेच नाही तर भारताच्या नादी रशियाने लागू नये, असेही त्यांनी म्हटले आहे. त्यांनी म्हटले की, मॉस्कोने चूक केली आहे. अमेरिकेने भारतावर विश्वास ठेवून त्याच्याशी संबंध सुधारले होते. पण आता त्यांनी भारतासोबतची भूमिका बदलली आहे. भारत आता रशियाचीही फसवणूक करेल. पाकिस्तानी तज्ज्ञांच्या मते, या प्रदेशातील उदयोन्मुख शक्ती भारत नाहीये. चीन हा या प्रदेशातील शक्ती आहे. त्यामुळे रशियाने चूक केली आहे. रशियाच्या युद्धनौका भारताचे संरक्षण करणार म्हटल्यावर अनेक देशांची झोप उडाली. अतिया यांनी पुढे म्हटले की, भारत कोणत्याही एका देशासाठी विशेष संतुलन बनण्याची कल्पना नाकारतो. भारताला अमेरिकेसोबत गुंतवणूक, चिनी वस्तू आणि रशियन घटक एकचवेळी हवीत आहेत. भारत आणि रशिया यांच्यातील करारानंतर पाकिस्तानची झोप उडाल्याचे बघायला मिळत आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली महसूलमंत्र्यांची भेट

## अनेक प्रलंबित प्रश्न लागणार मार्गी



**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघातील महसूल विभागाशी निगडित असलेल्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२१) रोजी महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी सविस्तर चर्चा होऊन लवकरच प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली. बीड जिल्ह्यातील महसूलात वाढ करणे, सुशिक्षित तरूणांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच महसूल विभागाचे प्रलंबित प्रकरणे मार्गी लावणे आणि मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेंतर्गत बीड मतदारसंघातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# पोखरीघाट ग्रामस्थांचा आदर्श पायंडा! हरिनाम सप्ताहात कुस्ती खेळाला प्रोत्साहन- राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

कुस्ती हा भारतातील पारंपरिक, मैदानी ताकदीचा व मानाचा खेळ म्हणून प्रसिद्ध आहे. मैदानी कुस्ती हा केवळ खेळ नसून ताकद, धैर्य, शिस्त आणि रांगड्या संस्कृतीचे प्रतीक मानला जातो. युवकांनी हा खेळ आत्मसात करून शरीरा सोबत मन ही सक्षम व सुदृढ करावे. अनेक नामांकित पैलवानांनी याच खेळातून देशाचे



नाव उज्ज्वल केले. पोखरीघाट ग्रामस्थांनी अध्यात्म आणि शिक्षणाला नेहमीच प्राधान्य दिले. अखंड हरिनाम महोत्सवा निमित्त जंगी कुस्ती मैदानाचे आयोजन करून मेहनती पैलवानांना प्रोत्साहन देणारा आदर्श पायंडा निर्माण केला. हा स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रुजवला पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पोखरी घाट येथील कुस्ती स्पर्धा प्रसंगी केले. पोखरी घाट ता बीड येथे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिर १६ वा.वर्धापन दिना ▶▶ उर्वरित पान २ वर

# सिरसदेवीत गांजा विक्रीवर छापा; पावणेतीन लाखाचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथे गांजाची बेकायदेशीर साठवण व विक्री करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखा (ङउइ) आणि तलवडा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत मोठा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत तब्बल २ लाख ६६ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात



आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना सिरसदेवी येथे गांजाची चोरटी विक्री सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीची पडताळणी करून वरिष्ठांच्या आदेशानुसार तात्काळ छापा टाकण्यात आला या छाप्यात शेख रईस शेख युसूफ (वय २५, रा. सिरसदेवी) याच्या घराची झडती घेतली असता, दोन लाख ६६ हजार ६४० रुपये किमतीचा आठ किलो ८८८ ग्रॅम गाजा यावेळी जप्त करण्यात आला. याप्रकरणी आरोपीला ▶ उर्वरित पान २ वर

**पाहिजेत**

● सिस्टर- (१ जागा)
ANM, GNM
अनुभव असल्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)

● मावशी- (२ जागा)
काम येणाऱ्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)

● भेटण्याची वेळ ११ ते २

-: संपर्क :-
जेथलिया हॉस्पिटल
जालना रोड, बीड
मो.क्रं. ७०२०५०३८३६

## पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणाचा निकाल १४ मे रोजी

# पद्मसिंह पाटील यांच्यासह ९ आरोपींचे भविष्य ठरणार ?

**धाराशिव । प्रतिनिधी**

राज्यभर गाजलेल्या पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरणाचा बहुप्रतीक्षित निकाल येत्या १४ मे रोजी लागणार आहे. तब्बल वीस वर्षांनंतर या प्रकरणाचा शेवट जवळ आला असून, राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. धाराशिवचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांचे वडील दिवंगत पवनराजे निंबाळकर



आणि त्यांच्या चालकाची २००६ मध्ये निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह एकूण ९ जणांवर गंभीर आरोप आहेत.

**काय आहे प्रकरण ?**

३ जून २००६ रोजी कळंबोली येथे पवनराजे निंबाळकर यांच्या गाडीवर गोळीबार करून त्यांची आणि चालक समद काझी यांची हत्या करण्यात आली. या हल्ल्यामागे सुपारी किलिंगचा कट असल्याचा ▶ उर्वरित पान २ वर

**बेसिक कोचिंग क्लासेस,बीड**

इयत्ता १ ली ते १० वी सेमी

समर व्हॅकेशन बॅचेस

कालावधी २० एप्रिल ते १ जुन पर्यंत

१६ वर्षांची यशस्वी परंपरा

संचालक : वायभट एम.यु.
MO : 8575717171

प्रवेश देणे सुरु आहे

पत्ता : रेणु हॉस्पिटल शेजारी, शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड

# 22 एप्रिल — पृथ्वी दिन : विकासाच्या वेगात हरवणारी पृथ्वी आणि जपण्याची सामूहिक जबाबदारी

मानवाच्या सभ्यतेचा इतिहास पाहिला तर तो निसर्गाशी असलेल्या सुसंवादातूनच उभा राहिलेला दिसतो . पृथ्वीने माणसाला अन्न , पाणी , हवा , ऊर्जा आणि जीवनासाठी आवश्यक असलेली प्रत्येक गोष्ट दिली . या निसर्गाशी असलेल्या सुसंवादामुळेच माणूस जगला , वाढला आणि प्रगत झाला . परंतु आधुनिक काळात विकासाच्या नावाखाली माणसाने निसर्गाशी असलेले हे नाते बदलले . उपयोग आणि उपभोग यामधील सीमारेषा पुसट झाली आणि त्याचा परिणाम म्हणून आज पृथ्वीवर अनेक संकटे उभी ठाकली आहेत . पृथ्वी दिन हा त्या बदलत्या वास्तवाची जाणीव करून देणारा आणि माणसाला आत्मपरीक्षणासाठी भाग पाडणारा दिवस आहे .

गेल्या काही दशकांत औद्योगिकीकरण , शहरीकरण आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे मानवी जीवनमानात मोठी सुधारणा झाली आहे . वाहतूक , दळणवळण , आरोग्य , शिक्षण या सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती झाली आहे . परंतु या प्रगतीसोबतच पर्यावरणावर मोठा ताण निर्माण झाला आहे . जंगलतोडीमुळे हरित क्षेत्र कमी झाले आहे , नद्यांचे आणि जलस्रोतांचे प्रदूषण वाढले आहे , आणि हवेत विषारी वायूंचे प्रमाण वाढले आहे . या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम म्हणून हवामान बदल ही समस्या आज जागतिक स्तरावर सर्वात गंभीर संकटांपैकी एक बनली आहे . तापमानात सातत्याने होणारी वाढ ही या बदलाची सर्वात ठळक चिन्ह आहे . उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र होत आहेत , हिवाळा कमी होत आहे आणि पावसाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे . कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी , या दोन्ही टोकाच्या परिस्थिती आता वारंवार अनुभवायला मिळत आहेत . या बदलांचा परिणाम केवळ पर्यावरणापुरता मर्यादित राहत नाही , तर तो थेट मानवी जीवनावर



आणि अर्थव्यवस्थेवरही होतो .

ग्रामीण भारतात या बदलांचे परिणाम अधिक स्पष्टपणे जाणवतात . शेतकऱ्यांचे जीवन हे निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असते . पावसाचे प्रमाण , त्याचा कालावधी आणि तापमान यावरच शेतीचे यश अवलंबून असते . परंतु हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतीचे गणित पूर्णपणे बदलले आहे . कधी पाऊस वेळेवर येत नाही , तर कधी अचानक अतिवृष्टी होऊन पिकांचे नुकसान होते . त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो आणि त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो .पाण्याची समस्या ही आज सर्वात गंभीर प्रश्नांपैकी एक बनली आहे . भूजल पातळी सतत खाली जात आहे . विहिरी कोरड्या पडत आहेत आणि अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे . पाण्याचा अति वापर आणि जलसंधारणाचा अभाव यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे . जर वेळेत उपाययोजना केल्या नाहीत , तर भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे . पृथ्वी दिन आपल्याला याच प्रश्नांकडे गंभीरपणे पाहण्याची संधी देतो . विकास आणि पर्यावरण यांच्यातील समतोल राखणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे . केवळ आर्थिक प्रगती करून चालणार नाही , तर ती टिकाऊ असणे आवश्यक आहे . निसर्गाचा विचार न करता केलेला विकास हा अल्पकालीन ठरतो आणि त्याचे दुष्परिणाम पुढील पिढ्यांना भोगावे लागतात .



**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार बीड**

झाडे लावणे ही एक साधी कृती वाटते , परंतु त्याचा परिणाम अत्यंत मोठा असतो . एक झाड अनेक जीवांना आश्रय देते , हवा शुद्ध करते आणि पर्यावरणाचा समतोल राखते . त्याचप्रमाणे पाणी वाचवणे , प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि ऊर्जा बचत करणे या गोष्टी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे . या छोट्या छोट्या कृतींचा एकत्रित परिणाम मोठा बदल घडवू शकतो . शासन विविध पर्यावरणपूरक योजना राबवत आहे . जलसंधारण , वृक्षारोपण , सौर ऊर्जा , हरित ऊर्जा यांसारख्या उपक्रमांमुळे सकारात्मक बदल घडत आहेत . परंतु या योजनांचे खरे यश हे लोकसहभागावर अवलंबून आहे . नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतल्याशिवाय पर्यावरण संरक्षण शक्य नाही .

आजची तरुण पिढी ही या बदलाची सर्वात मोठी आशा आहे . शिक्षणाच्या माध्यमातून पर्यावरणाबाबत जागरूकता वाढवणे , नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरणपूरक उपाय शोधणे आणि समाजाला प्रेरणा देणे हे काम तरुणांनी करणे आवश्यक आहे . डिजिटल युगात माहिती सहज उपलब्ध असल्यामुळे योग्य दिशेने प्रयत्न केले तर मोठा बदल घडू शकतो .

पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारची जबाबदारी नाही , तर ती प्रत्येक नागरिकाची आहे . आपण वापरत असलेल्या प्रत्येक संसाधनाचा योग्य वापर करणे आणि त्याचा अपव्यय टाळणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे . समाजातील प्रत्येक घटकाने या दिशेने प्रयत्न केले , तर मोठा बदल घडू शकतो . पृथ्वी ही केवळ वर्तमान पिढीची मालमत्ता नाही , तर ती पुढील पिढ्यांचीही आहे . आपण आज घेतलेले निर्णय भविष्यातील पिढ्यांच्या आयुष्यावर परिणाम करणार आहेत . त्यामुळे विकास करताना पर्यावरणाचा विचार करणे ही केवळ गरज नाही , तर ती आपली जबाबदारी आहे .

आजच्या दिवशी प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारावा – मी पृथ्वीच्या संरक्षणासाठी काय करत आहे ? जर प्रत्येकाने या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर दिले आणि त्यानुसार कृती केली , तर मोठा बदल घडू शकतो . पृथ्वी दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून तो जीवनशैली बदलण्याचा संदेश देतो . निसर्ग आणि विकास यांचा समतोल राखत पुढे जाणे हीच खरी प्रगती आहे . पृथ्वी वाचवणे म्हणजेच आपले भविष्य सुरक्षित करणे होय .

एकूणच , वाढत्या तापमानाच्या , बदलत्या हवामानाच्या आणि कमी होत चाललेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या पार्श्वभूमीवर पृथ्वी दिनाचे महत्त्व अधिक वाढले आहे . हा दिवस आपल्याला केवळ जागरूक करत नाही , तर कृती करण्याची प्रेरणाही देतो . आपण सर्वांनी मिळून निसर्गाचे रक्षण केले , तरच पृथ्वी सुरक्षित राहील आणि पुढील पिढ्यांसाठी एक समृद्ध आणि संतुलित भविष्य निर्माण होईल .

## हृदय जपा...जीवन जिंका...

आजच्या धावपळीच्या जगात आपण सगळे काहीतरी मिळवण्यासाठी सतत पळत आहोत. पैसा, प्रतिष्ठा, करिअर, यश पण या सगळ्या धावण्यात आपण एक गोष्ट विसरत आहोत – आपले स्वतःचे हृदय. आपण बाहेरून कितीही मजबूत दिसलो तरी आतल्या हृदयाची नाजूक धडधड आपल्याला जिवंत ठेवते. आणि जेव्हा हेच हृदय थकायला लागते, तेव्हा जीवनाचा अर्थच बदलतो.

● हार्ट अटॅक – अचानक नाही, संकेत देत येतो

बहुतांश लोकांना वाटतं की हार्ट अटॅक अचानक येतो. पण खरं काय आहे माहिती आहे का ? तो हळूहळू तयार होत असतो. आपल्या सवयींमध्ये, आपल्या विचारांमध्ये, आपल्या जीवनशैलीत.

● आपण रोज घेतलेले छोटे निर्णय –



उशिरापर्यंत जागणे
जंक फूड खाणे
व्यायाम टाळणे
तणाव मनात साठवणे
हे सगळं मिळून हृदयावर एक अदृश्य भार तयार करतं.
आणि एक दिवस शरीर सांगतं – आता पुरे !
चार शांत शत्रू जे हृदयावर हल्ला करतात

● हाय ब्लड प्रेशर

हे एक शांत वादळ आहे. तुम्हाला कळतही नाही आणि ते तुमच्या रक्तवाहिन्यांना आतून कमजोर करत असतं.
जणू एखाद्या भिंतीवर सतत दाब टाकला जातोय आणि एक दिवस ती भिंत कोसळते.

● कोलेस्ट्रॉल

आपण खातो ते अन्न आपल्या रक्तात साठतं.
वाईट कोलेस्ट्रॉल म्हणजे जणू रस्त्यावर जमा होणारी घाण –
ज्यामुळे वाहतूक थांबते आणि हृदयापर्यंत पोहोचणारा रक्तप्रवाह अडतो.

● डायबिटीज (ब्लड शुगर)

साखर गोड असते पण जास्त साखर शरीरासाठी विषासारखी काम करते.
ती हळूहळू रक्तवाहिन्या कमकुवत करते आणि हृदयाला धोक्यात टाकते.

● स्मोकिंग (तंबाखू)

क्षणिक आनंदासाठी घेतलेला धूर आयुष्य कमी करतो.
तो फक्त फुफ्फुसांनाच नाही, तर हृदयालाही जखमी करतो.

● पण अजूनही वेळ गेलेली नाही

जीवन आपल्याला नेहमी एक संधी देतं – स्वतःला बदलण्याची.

तुम्ही आज निर्णय घेतलात, तर उद्या तुमचं हृदय तुमचे आभार मानेल व हृदय निरोगी ठेवण्यासाठी साधे पण प्रभावी उपाय

१. चालायला सुरुवात करा
दररोज ३० मिनिटे चालणे – ही तुमच्या हृदयासाठी सर्वात मोठी भेट आहे.

२. अन्न बदला, जीवन बदलेल
घरगुती, संतुलित आणि पौष्टिक आहार घ्या.
तेलकट, प्रक्रिया केलेले पदार्थ कमी करा.

३. तणावाला दूर ठेवा
मन शांत ठेवा. ध्यान, योग, प्रार्थना – काहीतरी करा जे तुम्हाला शांतता देईल.

४. वाईट सवयींना नाही म्हणा
धूम्रपान, तंबाखू – हे सोडणे म्हणजे स्वतःवर केलेली सर्वात मोठी गुंतवणूक आहे.

५. नियमित तपासणी करा
३० वर्षांनंतर शरीराची काळजी घेणं ही जबाबदारी आहे, पर्याय नाही.

हृदय फक्त शरीराचा भाग नाही ते भावना आहे

आपण जेव्हा हसतो, प्रेम करतो, कोणासाठी जगतो – ते सगळं हृदयातून येतं. म्हणूनच हृदय जपणं म्हणजे फक्त आयुष्य वाढवणं नाही तर जीवनाची गुणवत्ता वाढवणं आहे.

● एक छोटी गोष्ट

एक व्यक्ती आयुष्यभर पैसा कमावण्यात व्यस्त होती.
घर, गाडी, प्रतिष्ठा – सगळं मिळवलं.
पण एक दिवस डॉक्टरांनी सांगितलं –
तुम्ही स्वतःसाठी कधी जगलात ?
तेव्हा त्याला जाणवलं –
तो जगण्यासाठी नाही तर फक्त धावण्यासाठी जगत होता.
आज स्वतःला एक वचन द्या– मी माझ्या शरीराची काळजी घेईन, मी माझ्या हृदयाचं ऐकेन
मी तणावापेक्षा आनंद निवडेन, मी आरोग्याला प्राधान्य देईन
कारण शेवटी आपण जगतो ते हृदयासाठीच.

◆ पान ९ वरून पुढे...

### सुनेत्रावहिनींच्या पाठीशी....

या प्रसंगी सुनेत्रा पवार म्हणाल्या, एका संघर्ष योध्याची मी सहचारिणी आहे, येसूबाई ज्याप्रमाणे लढल्या त्याचप्रमाणे मीही जनतेची कायम सेवा करीत राहील. दादा गेल्यानंतर बारामतीकरांनी मला व माझ्या कुटुंबाला भावनिक आधार दिला, मी आज मते मागण्यासाठी नाही तर नाते टिकवण्यासाठी मी तुमच्यासमोर उभी आहे. अजितदादांनी बारामतीला देशात नंबर एकचा तालुका बनवण्याचे जे स्वप्न पाहिले होते, ते आपण सर्वजण मिळून पूर्ण करू, दादांच्या विचारांचा वारसा तितक्याच ताकतीने पुढे नेण्यासाठी मी प्रयत्न करीन. दुःखाला कवटाळून बसणार नाही, जोपर्यंत बारामतीकर माझ्या पाठीशी आहेत तोपर्यंत न थांबता शिव शाहू फुले आंबेडकरांचा वारसा मी पुढे नेईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

### आ.संदीप क्षीरसागरांनी...

वाडी–वस्त्यांच्या रस्त्यांना रस्त्यासाठी भरीव तरतूद करावी, या आणि अशा अनेक महत्वपूर्ण विषयांवर ही बैठक झाली. यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मकता दर्शवून लवकरच प्रलंबित मार्गी लागणार असल्याचे आश्वासित केले आहे. त्यामुळे लवकरच अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार असल्याचे दिसून येत आहे.

### पोखरीघाट ग्रामस्थांचा....

निमित्त श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थांचे महंत महादेव महाराज भारती व हभप तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली भावार्थ रामायण व त्रिदिनी किर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते. हभप मारूती महाराज चोरमुले यांच्या कीर्तनाने सांगता झाली. या निमित्ताने सुमारे ४२ जंगी निकाली कुस्तींचे मैदान संपन्न झाले. ग्रामस्थांच्या वर्गणीतून सात लाख ६५ हजारांचे रोख बक्षीस वाटप करण्यात आले. अकराशे रु.पासून बक्षीसांची सुरवात होती.पै.माऊली जामदाडे व हरियाणा राष्ट्रीय विजेता पै.रविंद्रकुमार यांच्यात कुस्तीचा जंगी सामना रंगला.बक्षीस पटकावले.या थरारक निकाली कुस्तीने मैदानात जल्लोष पसरला. रखरखत्या उन्हातही कुस्ती स्पर्धेत उत्साह संचारला होता. कुस्त्यांचा सामना बघण्यासाठी लिंबागणेश– पोखरी परिसरातील अबालवृद्ध जनतेनी तोबा गर्दी केली होती. यापूर्वीह पोखरीघाट येथील शेतकरी शेतमजूर ग्रामस्थांनी लोक वर्गणीतून जिल्हा परिषद शाळेची भव्य इमारत उभारून शिक्षणासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिली. तर यावेळी अध्यात्मिक हरीनाम सप्ताहात मैदानी कुस्त्यांचा प्रेरणादायी स्तुत्य उपक्रम हाती घेतल्याने सर्वत्र कौतुक केले जात आहे.

### सिरसदेवीत गांजा....

ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध तलवडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत नायब तहसीलदार गजानन मोरे, सपोनि संतोष जंजाळ, पोउनि सुशांत सुतळे, तसेच पोलीस कर्मचारी आनंद मस्के, विकास राठोड, राहुल शिंदे, अंकुश वरपे, बबन सलगर, अतुल हराळे, सुधीर जोशी यांचा सहभाग होता.

### पवनराजे निंबाळकर.....

आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. सीबीआयच्या तपासानुसार, या हत्येसाठी सुमारे २५ लाख रुपयांची सुपारी देण्यात आली होती. अनेक महिन्यांच्या कटानंतर हा हल्ला घडवून आणण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

सुनावणीची स्थिती– या प्रकरणाची सुनावणी मुंबईतील विशेष न्यायालयात सुरू आहे न्यायाधीश एस. आर. नावंदर यांच्या कोर्टात ही सुनावणी सुरू आहे ४ जुलै २०११ पासून सुनावणी केली जाणार आहे.

साक्षीदार १२८ (यात समाजसेवक अण्णा हजारे यांचा समावेश)

माफीचा साक्षीदार: पारसमल जैन बादला

दरम्यान, अलीकडील सुनावणीला डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह ७ आरोपी हजर होते.

बचाव पक्षाची भूमिका– डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या वतीने तब्बल १२५० पानांचे लेखी म्हणणे सादर करण्यात आले आहे. या निवेदनात निंबाळकर कुटुंबावरच गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

तपासाची व्याप्ती– या प्रकरणाचा तपास तीन प्रमुख यंत्रणांनी केला आहे पोलीस, सीआयडी, सीबीआय

हत्या प्रकरणात २००९ मध्ये सीबीआयने डॉ. पद्मसिंह पाटील यांना अटक केली होती, तेव्हा ते खासदार होते. आता पुढे काय ? १४ मे रोजी होणारा निकाल हा केवळ एका हत्येचा निकाल नसून, महाराष्ट्रातील मोठ्या राजकीय प्रकरणाचा शेवट मानला जात आहे. या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### अनुसूचित जातींच्या...

अधीक्षक,मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले. या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात,लेनाजी गायकवाड, चेअरमन सुरेश निर्मळ, आरूण निर्मळ ( उपाध्यक्ष आल इंडिया पँथर सेना बीड),औदुंबर थोरात, सुरज कदम,बाळकृष्ण थोरात, अमोल निर्मळ, दिनेश आवसरे ,दादा थोरात, संदिप पवळ, रोहन आवसरे,सोनु पण थोरात, नितीन निर्मळ,बबलू थोरात, अक्षय थोरात,दिलीप ढास, तुकाराम गायकवाड,रिंकु निर्मळ, अंकुश गायकवाड, नामदेव थोरात, नामदेव आवसरे, संजय पावले गोवर्धन वाणी,केशव गिरे आदींसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण हे सत्ताधाऱ्यांचे 'फोडा आणि राज्य करा' धोरण आहे, असा आरोप करत डॉ. गणेश ढवळे यांनी ११ मे रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, अनुसूचित जातींच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण अशास्त्रीय पद्धतीने राबवले जात असून यामुळे आरक्षणाच्या मूळ उद्दिष्टालाच धक्का बसू शकतो. हा विषय संसदेकडील अधिकारक्षेत्रात येतो, त्यामुळे राज्य सरकारचा हस्तक्षेप बेकायदेशीर ठरू शकतो. न्या. अनंत बदर समितीने समाजातील घटकांशी पुरेशी चर्चा न करता अहवाल तयार केल्याचा आरोपही त्यांनी केला. सामाजिक न्याय, संविधानिक मूल्ये, समता व बंधुता टिकवण्यासाठी सर्व घटकांना न्याय मिळणे आवश्यक आहे. एका घटकाला न्याय देताना दुसऱ्यावर अन्याय होणार असेल, तर तो सामाजिक न्याय ठरू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात ११ मे रोजी बीड येथे होणाऱ्या महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले आहे.

### बीड जिल्ह्यात....

आहे, याचा प्रत्यय या घटनेतून आला आहे. सर्रास होणारे बालविवाह रोखण्यात प्रशासनाला अपयश येत असल्याने एका चिमुरडीला अशा भयानक शारीरिक आणि मानसिक वेदना सहन कराव्या लागल्या आहेत.

सासरच्या ५ जणांवर 'पोक्सो'सह विविध कलमान्वये गुन्हे– या प्रकरणी पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीवरून केज पोलिस स्टेशनमध्ये १७ एप्रिल रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये पती, सासू, सासरे यांच्यासह एकूण ५ जण आणि इतर काही नातेवाईकांचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ (कलम ९, १०, ११) आणि पोक्सो अंतर्गत कलम ४, ६, ८, १२, १७नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपास सुरू, कठोर कारवाईची मागणी– या प्रकरणाचा सखोल तपास फौजदार लक्ष्मण कीर्तने करत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून, दोषी नराधमांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. बालविवाहाच्या या अमानवी प्रथेचा बळी ठरलेल्या या मुलीला न्याय कधी मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### चाकूने वार करत....

त्यांनी दिले असून, त्यानुसार पोलिसांनी तत्परतेने ही मोहीम राबवली. भविष्यात अशा गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनाही करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीस ठाणे निरीक्षक शितलकुमार बल्लाळ,पो.हे.जाधव त्यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. गुन्हेगारीवर कडक कारवाई, नागरिकांची सुरक्षितता हीच प्राथमिकता, असा ठाम संदेश बीड शहर पोलिसांनी या कारवाईतून दिला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ‘झिरो ब्युरोक्रसी’कडे शासनाची वाटचाल; प्रशासनाने ‘स्टार्टअप’सारखे काम करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नागरी सेवा दिन आणि राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान’ अंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील प्रशासन अधिक पारदर्शक, गतिमान आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी ‘झिरो ब्युरोक्रसी’ची संकल्पना राबविण्याचा निर्धार व्यक्त करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाने ‘स्टार्टअप’प्रमाणे कार्य करण्याची गरज व्यक्त केली. सुलभ प्रक्रिया, पूर्वानुमेय आणि मानवी हस्तक्षेप कमी करून पात्र नागरिकांना थेट सेवा देणे हेच ‘झिरो ब्युरोक्रसी’चे मूळ तत्त्व असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. नागरी सेवा दिन २०२६ आणि ‘राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा २०२५-२६’ अंतर्गत पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. या सभारंभास कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकजकुमार तसेच पुरस्कारार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची ‘स्टार्टअप’शी तुलना करत, प्रत्येक विभागाने स्वतः कडे एक स्वतंत्र स्टार्टअप म्हणून



पाहिले पाहिजे, असे सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, झिरो ब्युरोक्रसी म्हणजे अधिकारी नसणे नव्हे, तर प्रक्रियांची पुनर्रचना (री-इंजिनिअरिंग) करून त्या अधिक सुलभ आणि पारदर्शक करणे होय. कोणत्याही व्यक्तीच्या पसंती-अपसंतीवर सेवा अवलंबून न राहता, पात्रतेनुसार सेवा मिळाली पाहिजे. या शासनाने १०० दिवस आणि १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत प्रशासनातील कार्यक्षमता वाढवण्यावर भर दिला असून, त्यातील ८५ टक्के उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून ‘इज ऑफ डुइंग बिझनेस’ सुधारण्यासाठी विविध प्रक्रियांचे सुलभीकरण करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी ‘विकसित महाराष्ट्र २०४७’चा आराखडा मांडताना २०२९, २०३५ आणि २०४७ हे तीन टप्पे निश्चित केल्याचे सांगितले. महाराष्ट्र आता देशांतर्गत नव्हे तर जागतिक पातळीवर स्पर्धा करत आहे. राज्याची अर्थव्यवस्था जगातील ३०व्या क्रमांकावर असून, आगामी काळात ती आणखी बळकट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रशासनातील सेवा वितरण सुधारण्यासाठी २० महत्त्वाच्या सेवांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, ‘आपले सरकार २.०’च्या माध्यमातून नागरिकांना अधिक सुलभ सेवा देण्याची तयारी सुरू असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रशासनातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या कामाकडे ‘स्टार्टअप’च्या दृष्टिकोनातून पाहिल्यास नावीन्य, कार्यक्षमता आणि वेग यांचा संगम साधता येईल. अशा उपक्रमांमुळेच प्रशासन ‘झिरो ब्युरोक्रसी’कडे वाटचाल करू शकते. यावेळी मुख्यमंत्र्यांनी नाविन्यपूर्ण आणि परिवर्तनशील कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करून प्रशासनातील कल्पकता आणि नव्या कल्पनांची अंमलबजावणी हीच भविष्यातील बदलाची दिशा ठरेल, असे सांगत त्यांनी सर्व पुरस्कारार्थ्यांचे अभिनंदन केले.

# मधुमित्र आणि मधुसखी पुरस्कारांसाठी अर्ज करावेत

**जालना । प्रतिनिधी**

राज्यातील मधमाशीपालन व्यवसायाला आधुनिक गती देण्यासाठी आणि या क्षेत्रात अहोरात्र कष्ट करणाऱ्या मधपाळांचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने वर्ष २०२६ चे मधुमित्र व मधुसखी पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या मानाच्या पुरस्कारांसाठी मंडळाने पात्र उमेदवारांकडून नामांकने मागविली असून दि.४ मे २०२६ पर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांपासून मंडळाने हा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. मधमाशीपालनात अनेक वर्षांपासून सातत्यपूर्ण आणि यशस्वी कार्य करणाऱ्या मधपाळांना या पुरस्काराद्वारे प्रोत्साहन दिले जाते. विशेष म्हणजे, महिला मधपाळांच्या कर्तृत्वाला दाद देण्यासाठी एक पुरस्कार मधुसखी या नावाने राखीव ठेवण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांना या पुरस्कारासाठीचे नामांकन अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mskvib.org उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच ज्यांना ऑनलाईन अर्ज करणे शक्य नाही, त्यांना प्रत्येक जिल्ह्याच्या खादी ग्रामोद्योग मंडळाच्या कार्यालयात प्रत्यक्ष अर्ज मिळू शकतील. पूर्ण भरलेले अर्ज मुदतीत संबंधित जिल्हा कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. असे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महाराष्ट्र दिनाच्या अनुषंगाने पूर्वतयारी बैठक संपन्न

## १ मे रोजी सकाळी ८.०० वा. पालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

**परभणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचा ६७ व्या स्थापना दिनानिमित्त १ मे रोजी सकाळी ८.०० वा. मुख्य शासकीय ध्वजारोहण परभणी येथील प्रियदर्शनी इंदिरा गांधी स्टेडियम येथे पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते होणार आहे. या समारंभाच्या पूर्वतयारीसाठी आज जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली. बैठकीस




महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, तहसिलदार डॉ. संदीप राजापुरे यांच्यासह पोलीस, सार्वजनिक बांधकाम, शिक्षण, क्रिडा, आरोग्य, महवितरण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र दिनाचा सोहळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागप्रमुखांना विविध सूचना केल्या. १ मे रोजी सकाळी ७.१५ वा. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर ८.०० वा. मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडेल. दि ३० एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वा. मुख्य ध्वजारोहण सोहळयाची रंगीत तालीम सदर क्रीडा संकुलावर होणार आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी यांनी आगामी जून महिन्यात जिल्हयात वृक्षलागवड मोहिम प्रभावीपणे राबविली जाणार असल्याचे सांगून पुरेशा प्रमाणात वृक्ष उपलब्धतेसाठी संबंधित विभागाने तयारी करण्याचे निर्देश यावेळी दिले.

# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींना उद्योगांमधील प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता यावा आणि त्यांच्या रोजगाराच्या संधी वाढाव्यात, यासाठी केंद्र शासनाची प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत जास्त युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात आले आहे. शिक्षण आणि प्रत्यक्ष उद्योग जगतातील कौशल्यांमधील दरी कमी करणे, हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. युवकांना प्रॅक्टिकल ट्रेनिंग देऊन देशासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. वय १८ ते २५ वर्षे, ६ ते ९ महिने नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिप, निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा ९ हजार रुपये आर्थिक सहाय्य मिळेल तसेच यशस्वी पूर्णतेनंतर अधिकृत अनुभव प्रमाणपत्र दिले जाईल. इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी जालना येथील मॉडेल करिअर सेंटर येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या रोप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने २६एप्रिल२०२६ रोजी धारावीत महाअधिवेशन!



**मुंबई । प्रतिनिधी**

समस्त कक्कय्या समाज महासंघाच्या रोप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने समाजातील सर्व घटकांना एकत्रित आणण्यासाठी आणि सरकारकडे कक्कय्या समाजाच्या मागण्या मांडून त्या सोडविण्यासाठी रविवार दिनांक २६एप्रिल २०२६ रोजी धारावीत एकदिवशीय महाअधिवेशन घेण्यात येणार आहे.सदर महाअधिवेशन मनोहर जोशी विद्यालय, प्रांगण, धारावी डेपो,पी एम जी पी संकुल जवळ, धारावी - मुंबई ४०० ०१७ येथे सकाळी ९ते ६ या वेळेत होणार आहे. सदर महाअधिवेशनासाठी श्री.सुशीलकुमार शिंदे (माजी गृहमंत्री ,भारत सरकार)कु.प्रणिती शिंदे (खासदार सोलापुर),श्री. रामदास आठवले(मंत्री सामाजिक न्याय विभाग भारत सरकार ), श्री.संजय शिरसाट(मंत्री सामाजिक न्याय विभाग,) श्री. मंगलप्रभात लोढा(मंत्री कौशल्य विकास), श्री.आशिष शेलार(माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक मंत्री )वर्षाताई गायकवाड (खासदार ),श्री.अनिल देसाई (खासदार ),श्री.राहुल शेवाळे (माजी खासदार ), श्री.अमित साटम (आमदार),सौ. कल्पना नरहिरे(माजी खासदार ),ज्योती गायकवाड(आमदार )श्री. ज्ञानराज चौगुले (माजी आमदार ),श्री. सुभाष साबणे (माजी आमदार ) श्री.बाबुराव माने (माजी आमदार ),श्री. धर्माजी सोनकवडे(माजी आमदार)तसेच समाजातील अनेक नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# राज्यात आरोग्य अभियानांची व्यापक अंमलबजावणी

## सिकलसेल, बाल आरोग्य, मातृ आरोग्य, क्षयरोग, कुष्ठरोग आणि असंसर्गजन्य आजारांवर राज्याची प्रभावी मोहीम

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात ॅराबविण्यात येणाऱ्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांना विशेष गती मिळाली असून, ३१ मार्च २०२६ अखेर राज्याने आरोग्य सेवांमध्ये उल्लेखनीय प्रगती साध्य केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या निर्देशानुसार जानेवारी २०२६ पासून राज्यभर विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सिकलसेल, बाल आरोग्य, मातृ आरोग्य, क्षयरोग, कुष्ठरोग तसेच असंसर्गजन्य आजारांवर लक्ष केंद्रित करून व्यापक स्तरावर काम करण्यात आले आहे.

अरुणोदय सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान- ‘अरुणोदय’ सिकलसेल ॲनेमिया विशेष अभियान हे राज्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे. सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये १५ जानेवारी २०२६ पासून ही मोहीम राबविण्यात आली. शहरी, ग्रामीण तसेच आदिवासी व दुर्गम भागांमध्ये घराघरांत जाऊन तपासणी करण्यात आली. ० ते ४० वयोगटातील तब्बल ७४ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली असून, त्यामध्ये २३७६ नवीन रुग्ण व ३९५५४ वाहक आढळले. याशिवाय युवकांचे विवाहपूर्व व महिलांचे गर्भधारणेपूर्व समुपदेशन मोठ्या प्रमाणात करण्यात आले, ज्यामुळे भविष्यातील पिढ्यांमध्ये या आजाराचे प्रमाण कमी करण्यास मदत होणार आहे.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम- राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांच्या आरोग्याला विशेष प्राधान्य देण्यात आले. जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान ६०५ हृदय शस्त्रक्रिया आणि ४,२८१ इतर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या. या उपक्रमामुळे अनेक बालकांना नवजीवन मिळाले असून, बाल आरोग्याच्या दृष्टीने हा मोठा टप्पा मानला जात आहे.

मातृ आरोग्य- मातृ आरोग्याच्या दृष्टीने तीव्र रक्तक्षय असलेल्या गरोदर महिलांसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. राज्यातील ६,३९३ गरोदर मातांची तपासणी करून त्यापैकी ५,७०४ मातांना आयर्न सुक्रोज किंवा फेरिक कार्बोक्सी माल्टोज उपचार देण्यात आले. या उपचारांमुळे मातामृत्यू कमी होण्यास आणि सुरक्षित प्रसूतीस मोठी मदत होत आहे.

हत्तीरोगाने बाधित रुग्णांसाठीही शस्त्रक्रिया मोहिमेला वेग देण्यात आला. २०२५ मध्ये सर्वेक्षणांतर्गत एकूण १७६५ अंडवृध्दी शस्त्रक्रियेकरीता पात्र रूग्णांची नोंद करण्यात आली. त्यापैकी डिसेंबर २०२५ अखेर एकूण ४६६ अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत १२८९ पात्र रुग्णांपैकी ५६३ रुग्णांवर अंडवृध्दी शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या.

‘मलेरिया मुक्त गडचिरोली’- गडचिरोली जिल्ह्यात ‘मलेरिया मुक्त गडचिरोली’ अभियानांतर्गत प्रभावी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १८/०२/२०२५

**CHANGE IN NAME**

I DECLARED BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

**Older name** - KULKARNI ONKAR CHANDRAKANTRAO

**New name** - KULKARNI ONKAR CHANDRAKANT

**Address:** S/O: Chandrakant Kulkarni, Kabad Galli, Beed, Dist. Beed, Maharashtra - 431122

**Mobile- 7385548028**

# तुलसी इंग्लिश स्कूलचा पदवी समारंभ:

## शौर्य डोंगरेसह युकेजी वर्गातील विद्यार्थी सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्षम होणे गरजेचे आहे. या दृष्टीने तुलसी शैक्षणिक समूह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन मान्यवरांनी केले.

बीड येथील तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये मंगळवार (दि. २१) रोजी इयत्ता युकेजी वर्गातील विद्यार्थ्यांचा पदवी समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार सुनिल डोंगरे, डॉ. विजयकुमार बांदल, डॉ. सुनिल जोंधळे व व्हाईस प्रिन्सिपल सय्यद सिद्दिकी उपस्थित होते. मान्यवरांनी सांगितले की, संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबरोबरच सुसंस्कार आणि



व्यक्तिमत्त्व विकासावरही भर देत आहे. यामुळे येथील विद्यार्थी सक्षम आणि जबाबदार नागरिक बनतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.पदवी समारंभात इयत्ता यूकेजी वर्गातील शौर्य सुनील डोंगरे याच्यासह सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांचे शाळेकडे बारकाईने लक्ष असून, प्रिन्सिपल उमा जगतकर या व्यवस्थापन, शिक्षक व विद्यार्थी यांच्यात सुसंवाद ठेवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवत असल्याचे नमूद करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रिन्सिपल उमा जगतकर यांनी केले. सूत्रसंचालन शेख सरताज यांनी, तर आभार वंदना राठोड यांनी मानले. पदवी समारंभाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तुलसी इंग्लिश स्कुल शाळेच्या स्टाफने मोलाचे योगदान दिले. पदवी समारंभाचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तुलसी इंग्लिश स्कुल शाळेच्या स्टाफने मोलाचे योगदान दिले.

**जाहिर प्रगटन**

**मा. श्री. ए. एस. जगताप दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ५० / २०२६**

**शहाबाई भ्र. लक्ष्मण सोनवणे वि. निरंक**

अर्जदार : **१) शहाबाई भ्र.लक्ष्मण सोनवणे वय ७६ वर्ष, धंदा घरकाम, रा. खांबा पो. खालापुरी ता. शिरुर (का) जि. बीड. २) सुदाम पि.लक्ष्मण सोनवणे, वय - ४४ वर्ष, धंदा - शेती, रा. सदर, ३) संदिप पि.लक्ष्मण सोनवणे, वय - ३० वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ४) मंगलबाई भ्र. भास्कर तांदळे वय - ४७ वर्षे, धंदा घरकाम रा. वंजारवाडी ता.जि. बीड. ५) लता भ्र. बाजीराव थोरवे, वय - ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा. खांबा पो. खालापुरी ता. शिरुर (का) जि. बीड**

अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ऑक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत

ज्यापोक्षा मयत नामे लक्ष्मण पि.कारभारी सोनवणे, यांचा मृत्यू दि. १६-०९-२०२५ रोजी मौजे खांबा पो. खालापुरी ता.शिरुर (का)जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा धैवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक१६.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर **प्रकरणात पुढील तारीख ०८.०५.२०२६ ही आहे.**

**(ॲड. डी. एम. रोटे)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) सहायक अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर शिरूर**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**जाहिर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ५८० / २०२६**

CNR No. MHBI020000113220 26

**अतुल महादेव भोसले वि. निरंक**

अर्जदार :- **१. अतुल पि. महादेव भोसले, वय - ३७ वर्ष, धंदा शेती, रा. पोखरी घाट पो. लिंबागणेश ता. जि.बीड २. राहुल पि. महादेव भोसले, वय-३८ वर्ष, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे. ३. वैशाली भ्र. विनोद वाघमारे, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सौदाना ता. जि. बीड. ४. त्रिशाला भ्र. राजाराम वाघमारे, वय-३० वर्षे, धंदा घरकाम, रा. आहेर वडगाव ता. जि. बीड**

**विरुध्द निरंक**

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ४ यांनी या न्यायालयात महादेव मोहन भोसले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत महादेव मोहन भोसले यांचा मृत्यु दिनांक २५/०१/२०२६ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. ३ व ४ या मयताच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत महादेव मोहन भोसले यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **प्रकरणातील पुढील तारीख ११ /०६/ २०२६**

आज दिनांक १३ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **(मार्फत ॲड. की. बी. पारगांवकर)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर बीड**

शिक्का **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार दि. २२ एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### सहयोगनगर येथील गजानन महाराज मंदीरात गुरूवारी शिवलिंग चलप्राणप्रतिष्ठा



**बीड । प्रतिनिधी**

वैशाख शुक्ल सप्तमी, गंगा उत्पत्ती दिनानिमित्त गुरुवार, दि.२३ एप्रिल रोजी शहरातील सहयोगनगर येथील श्रीगजानन महाराज मंदिरात 'श्रीमहादेव-श्रीनंदी' यांसह 'हरीहर शिवलिंग'चा चलप्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या विशेष शिवलिंगामध्ये ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रित दर्शन घडणार असल्याने भाविकांसाठी हा दुर्मीळ आध्यात्मिक योग मानला जात आहे. मातीचा साचा, त्यानंतर फायबर व मेणाच्या साच्यांद्वारे ओतीव पितळी धातूपासून या शिवलिंगाची निर्मिती करण्यात आली आहे. चैत्र कृष्ण चतुर्दशी, दि. १६ एप्रिल रोजी 'शिवलिंग उत्पत्ती' दिनी शिल्प पूर्णत्वास गेले. दि.१८ एप्रिल रोजी हे शिवलिंग शिल्पकाराकडून श्रीक्षेत्र शेगाव येथे नेण्यात आले असून, अक्षय तृतीया मुहूर्तावर दि.१९ एप्रिल रोजी बीड येथे आगमन झाले. प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५.३० ते ८.१५ या वेळेत श्रीगणेश, श्रीविठ्ठल-रुख्मिणी, श्रीगजानन महाराज, श्रीगुरुदेव दत्त व श्रीराम पंचायतन दैवतांच्या पूजनाने होईल. त्यानंतर सकाळी ८.३० ते ११.३० दरम्यान 'हरीहर शिवलिंग'वर रुद्राभिषेक पार पडणार आहे. दुपारी १२ वाजता महाआरती होऊन महाप्रसादाला प्रारंभ होईल. या सोहळ्यास भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्री गजानन सांस्कृतिक मंडळ, सहयोग नगर बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आष्टी येथे लाच घेताना महिला सहाय्यक अभियंता एसीबीच्या जाळ्यात

## लाचखोरांचा सुळसुळाट ! सोलर प्रकल्प पडताळणीसाठी मागितली लाच

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात लाचखोरीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, गेवराई तालुक्यात ग्रामसेवकाला लाच घेताना रंगेहात पकडल्याची घटना ताजी असतानाच अवघ्या २४ तासांत आष्टी येथे महिला सहाय्यक अभियंता एसीबीच्या जाळ्यात अडकल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या



कारवाईमुळे पुन्हा एकदा सिद्ध झाली की बीड जिल्ह्यात लाच मागण्याच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली असून कोणत्याही शासकीय निमशासकीय कार्यालयात पैसे दिल्याशिवाय कामात होत नसल्याच्या तक्रारी देखील आहेत. लाच मागण्यांमध्ये महिला कर्मचारी अधिकारी देखील कमी नाहीत हे या कारवाईवरून सिद्ध झाले आहे. मंगळवारी (दि. २१) आष्टी येथील महावितरण कार्यालयातील सहाय्यक अभियंता कोमल शिंदे यांना १८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात अटक केली. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या सोलर प्रकल्पाची पडताळणी करून देण्यासाठी शिंदे यांनी १८ हजार रुपयांची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल केल्यानंतर सापळा रचण्यात आला. दरम्यान, तक्रारदाराकडून लाच स्वीकारताना एसीबीच्या पथकाने शिंदे यांना रंगेहात पकडले. ही कारवाई उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मागील दोन महिन्यापासून लाचखोरावर होत असलेल्या सलग कारवायांमुळे महावितरणसह शासकीय विभागांत खळबळ उडाली असून एसीबीकडून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईत मच्छिंद्र बीडकर, अमोल खरसाडे, प्रदीप सुरवसे आणि अंबादास पुरी यांनी सहभाग घेतला.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण विरोधात लिंबागणेश येथे निदर्शने; 11 मे बीड मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारकडून अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रस्ताव पुढे आल्याच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरवादी समाज आक्रमक झाला असून लिंबागणेश येथे निदर्शने करण्यात आली. बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भिम टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांच्या नेतृत्वाखाली



आंदोलन पार पडले. सरकारकडून अनुसूचित जातीतील ५९ जातींचे अ, ब, क, ड अशा गटांमध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती समोर येत असून, या निर्णयामुळे समाजात फुट पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. सामाजिक ऐक्य धोक्यात येईल, विविध घटकांमध्ये संघर्ष व अविश्वास वाढेल, अशी भीती आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. फडणवीस सरकारने नेमलेल्या न्या. अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक न करता हरकती व सूचना मागवण्यात आल्यामुळे आंबेडकरी समाजात नाराजी असल्याचे निदर्शनास आले. समितीचा अहवाल तातडीने जाहीर करावा, तसेच उपवर्गीकरणाचा आधार व पद्धत स्पष्ट करावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदन मंडळ अधिकारी उज्ज्वला राऊत, सहाय्यक फौजदार विठ्ठल राठोड, पोलिस जमादार अविनाश घुंगरट यांच्या मार्फत जिल्हाधिकारी , पोलिस ▶▶ उर्वरित पान २ वर

# धारूर शहर व तालुक्यात 221 कर्मचाऱ्यांवर जनगणनेची जबाबदारी

**बीड । प्रतिनिधी**

जनगणना प्रक्रियेसाठी शहर व ग्रामीण भागात मिळून एकूण २२१ कर्मचाऱ्यांवर जबाबदारी देण्यात आली असून, या कामासाठी तालुक्याचे दोन भाग करण्यात आले आहेत. प्रत्येक जनगणनेस १४ मेपासून सुरुवात होणार आहे. धारूर शहरात २६ प्रगणक तर ग्रामीण भागात १७५ प्रगणक नियुक्त करण्यात आले आहेत. संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी १७ सुपरवायझर, ३ मास्टर ट्रेनर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जनगणना प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने होणार असून, प्रत्येक कुटुंबाकडून ३१ प्रश्नांच्या आधारे माहिती संकलित करण्यात येणार आहे. गुरुवार, २३ एप्रिल रोजी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून, प्रत्यक्ष जनगणना कामास १४ मेपासून सुरुवात होणार



आहे. यासाठी तहसील कार्यालय, नगरपरिषदेमधील अधिकारी आणि प्रमुख कर्मचाऱ्यांना देखील प्रशिक्षण देण्यात आले आहे. अंतर्गत प्रत्येक कुटुंबाची सविस्तर नोंद केली जाणार आहे. ग्रामपातळीवर शहरात प्रत्यक्ष कुटुंब सर्वेक्षण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना स्वतंत्र मानधन व भत्ताही देण्यात येणार आहे.

# बीड जिल्ह्यात चाललंय तरी काय ?

## आधी बालविवाह, आता अवैध गर्भपात; सासरच्या ५ जणांवर गुन्हा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात प्रशासनाचे कायदे फक्त कागदावरच राहिले आहेत का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. जिल्ह्याच्या केज तालुक्यातून एक अत्यंत संतापजनक आणि सुन्न करणारी घटना समोर आली आहे.

खेळण्या- बागडण्याच्या वयात एका १६ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा बळजबरीने बालविवाह लावून दिल्यानंतर, तिच्यावर झालेल्या अत्याचारातून ती गर्भवती राहिली आणि अखेर तिचा अवैध गर्भपात करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केज तालुक्यातील एका गावातील




अनुसूचित जमातीच्या अवघ्या १६ वर्षे ३ महिने वय असलेल्या मुलीचा वर्षभरापूर्वी बेकायदेशीरपणे बालविवाह लावून देण्यात आला होता. मुलगी अल्पवयीन आहे हे माहीत असतानाही समाजातील काही तथाकथित पुढाऱ्यांनी आणि नातेवाईकांनी तिचे लग्न लावून दिले. सासरी नांदत असताना, शारीरिक अपरिपक्वता असूनही पतीकडून झालेल्या वारंवार शरीरसंबंधांमुळे ही चिमुरडी गर्भवती राहिली.

पीडित मुलगी ६ महिन्यांची गरोदर असताना, तिचे वय आणि शारीरिक क्षमता नसतानाही तिला अवैध पद्धतीने गर्भपाताला सामोरे जावे लागले. स्वतः एक मूल असताना तिच्या पोटात वाढणाऱ्या ६ महिन्यांच्या अंकुराचा अशा प्रकारे जीव घेणे, ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना ठरली आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालावरून या प्रकरणातील भीषण वास्तव समोर आले आणि पोलिस प्रशासन हादरले.

'बेटी बचाव, बेटी पढाओ'च्या घोषणा देणारी शासकीय यंत्रणा बीड जिल्ह्यात किती सुस्त ▶▶ उर्वरित पान २ वर

# चाकूने वार करत मोबाईल लुटणारा पोलिसांच्या ताब्यात

## गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपी अटक ; बीड शहर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात चाकूचा धाक दाखवून रॉबरी करणाऱ्या फरार आरोपीला अटक करण्यात बीड शहर पोलिसांना यश आले आहे. गंभीर गुन्ह्यातील आरोपीला ताब्यात घेतल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास बसस्थानकासमोरील वंदना हॉटेल परिसरात ही घटना घडली होती. फिर्यादी उमेश सुनील पारिक (वय ३०, रा. काशी नगर, जालना रोड, बीड) यांच्यावर आरोपीने चाकूने हल्ला करत मारहाण



केली आणि जबरदस्तीने त्यांच्या खिशातील ओप्पो -११ कंपनीचा मोबाईल (किंमत अंदाजे २० हजार रुपये) लुटून घटनास्थळावरून पळ काढला होता. या हल्ल्यात फिर्यादी जखमी झाले होते.

या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ००७४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलिसांनी माहितीकारांचे जाळे आणि तांत्रिक विश्लेषणाचा प्रभावी वापर करत आरोपीचा माग काढला. अखेर विनोद मुळे (रा. भाजी मंडई, बीड) यास अटक करण्यात आली असून त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण करणाऱ्या आणि गंभीर गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचे निर्देश ▶▶ उर्वरित पान २ वर

# ना दरपत्रक, ना पावती; प्रवाशांनाच दमदाटी; बसस्थानकात पार्किंगच्या नावाखाली लूट; कायदा-सुव्यवस्था धाब्यावर, माफियांचे राज्य

**बीड । प्रतिनिधी**

बस पकडायची म्हणून गाडी उभी केली, तर दोन-चार मुलं अंगावर धावून आली. पावती मागितली तर थेट गचांडी धरली आणि हाणामारीची भाषा केली. धक्कादायक म्हणजे, बस स्थानकावरच्या पोलिसांकडे दाद मागायला गेलो, तर त्यांच्यासमोरच त्या पोरांनी मला मारहाण केली.

आता सांगा, सामान्य माणसाने दाद मागायची कुणाकडे? ही पार्किंग आहे की गुंडांचं वसुली केंद्र?

ही व्यथा केवळ एका प्रवाशाची नाही, तर जिल्ह्याचं मुख्य केंद्र असलेल्या बीड बस स्थानकात रोज येणाऱ्या हजारो नागरिकांची आहे. सध्या बीड बस स्थानकाचा कारभार रामभरोसे झाला असून, पार्किंगच्या नावाखाली प्रवाशांची उघडपणे लूट सुरू आहे. विशेष म्हणजे, या लुटीकडे प्रशासन का दुर्लक्ष करत आहे, असा सवाल आता विचारला जात आहे. नियमानुसार



पार्किंगच्या ठिकाणी दराचा फलक असणे बंधनकारक आहे, पण येथे तो जाणीवपूर्वक लपवण्यात आला असून कोणतीही अधिकृत पावती न देता पैसे उकळले जात आहेत.

बस स्थानक प्रशासन आणि पार्किंग कंत्राटदार यांच्यात असलेल्या अर्थपूर्ण संबंधांमुळेच हा अनागोंदी कारभार सुरू असल्याची चर्चा प्रवाशांमध्ये आहे. अधिकाराची भाषा करणाऱ्या किंवा पावती मागणारे प्रवासी या पार्किंग माफियांच्या निशाण्यावर आहेत.

स्थानक प्रमुखांकडे तक्रार करायला गेल्यावर तिथेही सुनावणी होण्याऐवजी तक्रारदारालाच गप्प करण्याचा प्रयत्न केला जातो. पोलिसांच्या उपस्थितीत जर सामान्यांवर हात उचलला जात असेल, तर बीड बस स्थानकात कायद्याचा धाक उरला आहे का? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.

### ● खाकीचा धाक संपला ?

**सामान्य माणसाने अन्यायाविरुद्ध दाद कोणाकडे मागावी? हा प्रश्न येथे उपस्थित होतोय. पार्किंगच्या नावाखाली सुरू असलेल्या या लुटीची तक्रार जर पोलिसांकडे केली, तर कंत्राटदाराची माणसे चक्क पोलिसांच्या उपस्थितीतच प्रवाशांवर हात उचलतात. पोलिसांचा धाक उरला नसल्याने या पार्किंग माफियांचे धाडस वाढले आहे.**

### ● प्रशासनाचे अर्थपूर्ण मौन ?

**नियमानुसार पार्किंगच्या ठिकाणी दराचा मोठा फलक असणे आणि रीतसर पावती देणे बंधनकारक आहे. मात्र, बीड बस स्थानकात या नियमांना केराची टोपली दाखवली गेली आहे. स्थानक प्रमुखांचे आणि पार्किंग चालकांचे मैत्रीपूर्ण संबंध सर्वश्रुत असल्यानेच हा सर्व अनागोंदी कारभार सुरू असल्याची चर्चा आहे.**